# महाराष्ट्र विधानपरिषद

## पाचवे (हिवाळी) अधिवेशन, २०२४

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये रुग्णसेवा केलेल्या कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्यांना कायमस्वरुपी सेवेत सामावून घेण्याबाबत

**(१) ८६४९ (१०-०६-२०२१) श्री.सदाशिव खोत, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये मागील दोन वर्षांपासून कोरोना काळात रुग्णसेवा केलेल्या ८३५ बीएएमएस वैद्यकीय डॉक्टरांना तसेच आरोग्य कर्मचारी (कोविड योध्दे) यांना कोरोना रुग्ण संख्या कमी झाल्यावर सेवेतुन कार्यमुक्त करण्यात येत असल्याची बाब माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंत्राटी पध्दतीने नेमणूक झालेल्या डॉक्टरांना कार्यमुक्त करुन त्याठिकाणी "एमबीबीएस" अर्हताधारकांची नेमणूक करण्यात येत आहे, तसेच कोरोना महामारीच्या काळात राज्यात कर्मचारी अपुरे पडल्याने तात्पुरते कर्मचारी सेवेत घेण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात सर्वत्र कोरोनाचा शिरकाव झाल्यापासून बीएएमएस अर्हताधारक कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी स्वत:च्या जिवाची पर्वा न करता रुग्णसेवा केली अशा वैद्यकीय अधिकाऱ्यांना/डॉक्टरांना तसेच आरोग्य कर्मचारी यांना कार्यमुक्त करण्यामागची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, राज्यात विशेषत: ग्रामीण भागात एमबीबीएस डॉक्टरांची कमतरता असून ही कमतरता दूर करण्यासाठी कायमस्वरूपी बीएएमएस डॉक्टरांना सेवेत समावून घेण्यात यावे अशी मागणी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्यांना व आरोग्य कर्मचारी यांना कायमस्वरुपी सेवेत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२०-०८-२०२४) :** (१) दिनांक ०४/०७/२०१९ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची पदे रिक्त राहू नयेत याकरीता सदर पदे कंत्राटी एमबीबीएस अर्हताधारकांमधून प्राधान्याने भरण्यात यावीत तसेच त्यानंतरही सदर पदे रिक्त राहत

असल्यास ती पदे नियमित अथवा कंत्राटी एमबीबीएस अर्हताधारक वैद्यकीय अधिकारी मिळेपर्यंत बी.ए.एम.एस. अर्हताधारकांमधून कंत्राटी पध्दतीने भरण्याबाबत निर्देशित केल्यानुसार सदर पदांवर कंत्राटी पध्दतीने बीएएमएस वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत.

बंधपत्रित एमबीबीएस अर्हताधारक उमेदवार उपलब्ध होत असून त्यांना पदस्थापना देणे आवश्यक असल्याने कंत्राटी बीएएमएस वैद्यकीय अधिकारी यांना कार्यमुक्त करण्यात येत आहे.

(२) व (३) संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे दिनांक १३/११/२०२० रोजीच्या पत्रानुसार बंधपत्रित उमेदवारांना ऑनलाईन पध्दतीने बंधपत्रित सेवा उपलब्ध करुन देण्याबाबत सुचीत केलेले आहे. तसेच त्यांचे पत्र दिनांक ११/०४/२०२१ अन्वये एकूण २५११ बंधपत्रित उमेदवारांची यादी आयुक्तालयास प्राप्त झाली असून सदर उमेदवारांना बंधपत्रित सेवेकरीता उपसंचालक कार्यालयाकडे वर्ग करण्यात आलेले आहे. बंधपत्रित एमबीबीएस अर्हताधारक उमेदवार उपलब्ध होत असून त्यांना पदस्थापना देणे आवश्यक असल्याने कंत्राटी बीएएमएस वैद्यकीय अधिकारी यांना कार्यमुक्त करण्यात येत आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये कोरोना काळात कंत्राटी आरोग्य कर्मचारी कोविड योध्दे म्हणून तात्पुरत्या स्वरुपात नियुक्त करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे त्यांना कार्यमुक्त करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) हे खरे आहे.

(५) वैद्यकीय अधिकारी, गट-अ या पदावर नियमित वैद्यकीय अधिकारी तसेच बंधपत्रित उमेदवारांना नेमणूक देण्याबाबतचे धोरण आहे. तथापि, कोविड-१९ साठी राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत मंजूर पदांच्या अधीन राहून आवश्यकतेनुसार कंत्राटी बीएएमएस वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सेवा घेण्याचा विचार करण्यात यावा असे आयुक्तालयाचे दिनांक ०६/०५/२०२१ च्या पत्रान्वये सर्व जिल्हाधिकारी यांना कळविण्यात आलेले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील जिल्हा पुरस्कार मिळालेल्या सर्व शिक्षकांना अतिरिक्त वेतनवाढीचा लाभ देण्याबाबत

**(२) १४६३८ (२५-०८-२०२२) श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दिनांक ४ सप्टेंबर, २०१८ पर्यंत जिल्हा पुरस्कार मिळालेल्या सर्व शिक्षकांना अतिरिक्त वेतनवाढीचा लाभ देण्याबाबत आदेश देण्यात आल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जिल्हा पुरस्कार मिळालेल्या सर्व शिक्षकांना अतिरिक्त वेतनवाढीचा लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (१२-०८-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) शासनपत्र दिनांक ०१/०७/२०२२ अन्वये, दिनांक ४ सप्टेंबर, २०१८ पर्यंतच्या आदर्श जिल्हा पुरस्कार प्राप्त शिक्षकांना आगाऊ वेतनवाढीचा लाभ देण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

त्याचप्रमाणे सर्व जिल्हा परिषदांना शासनपत्र दिनांक ०६/१०/२०२३ अन्वये आदर्श पुरस्कार प्राप्त शिक्षकांना जिल्हा परिषदेकडे प्राप्त होणाऱ्या स्वनिधीतून पुरस्कार प्राप्त शिक्षकांना आगाऊ वेतनवाढीपोटी अनुज्ञेय देय होणारी रक्कम तात्काळ अदा करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मढ (मुंबई) येथे महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने अक्सा समुद्रकिनाऱ्यावर नियमांचे उल्लघंन करुन बांधलेल्या भिंतीबाबत

**(३) १९४६१ (०८-०८-२०२३) श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने सागरी जीवांची उत्पत्ती वाढविण्यासाठी तसेच जैवविविधतेचे संरक्षण करण्यासाठी अक्सा समुद्रकिनाऱ्यावर (मढ, जि.मुंबई) येथे नियमांचे उल्लंघन करुन बांधलेल्या भिंतीप्रकरणी पर्यावरण तज्ज्ञांनी राष्ट्रीय हरित लवादाकडे दिनांक १८ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास तक्रार दाखल केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी राष्ट्रीय हरित लवादाने कोणता निर्णय घेतला आहे व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय बनसोडे (०५-०९-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) १. कामाच्या तक्रारीच्या अनुषंगाने धूप प्रतिबंधक बंधाऱ्याच्या Layout, Location आणि उपयुक्तेसाठी IIT आणि CWPRS, Pune यांच्याकडून अभ्यास करण्यात आला आहे.
२. केंद्रीय जल व विद्युत अनुसंधान शाळा (CWPRS), पुणे यांच्या अहवालानुसार सदरचे काम करण्यात आले आहे
३. सदर कामास पर्यावरण विषयक परवानग्या घेण्यात आल्या आहेत.
४. सदर प्रकरण हे राष्ट्रीय हरित लवादामध्ये न्यायप्रविष्ट आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ठाणे जिल्ह्यातील कर्णबधिर प्रवर्गाच्या विशेष शाळांना सातव्या वेतन आयोगाची थकबाकी मिळण्याबाबत

**(४) १९५७६ (११-०८-२०२३) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील कर्णबधीर प्रवर्गाच्या विशेष शाळांना सातव्या वेतन आयोगाची थकबाकी त्वरित मिळण्याबाबत शाळा, कर्मशाळा शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी संघटना, (जि) ठाणे यांनी शासनाकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सामाजिक न्याय विभागाच्या दिनांक १३ सप्टेंबर, २०२२ च्या परिपत्रकाप्रमाणे फरकाची रक्कम शाळा निहाय समाज कल्याण विभागामार्फत पुणे आयुक्त तसेच सामाजिक न्याय विभागाकडे पाठविण्यात आलेली असून त्यावर अद्याप पर्यंत कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नसून उक्त परिपत्रकानुसार यापुढे ही रक्कम मंत्रालय स्तरावरून अदा करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मागील एक वर्षापासून सर्व शाळांनी फरकाच्या रकमेचा तक्ता समाज कल्याण अधिकारी, ठाणे यांच्याकडे पाठविलेला असून वेतन आयोगाच्या फरकाबाबत पुरेशी रक्कम शासनाकडे उपलब्ध असतानाही सातव्या वेतन आयोगाचा फरक अदा करण्याबाबत अद्याप पर्यंत कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन ठाणे जिल्ह्यातील कर्णबधीर शाळांना सातव्या वेतन आयोगाची थकबाकी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०८-०८-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

दिनांक १३ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये सातव्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम विहित कार्यपध्दतीने शासनातर्फे आयुक्त, दिव्यांग कल्याण आयुक्तालय, पुणे यांना व आयुक्त यांचेमार्फत जिल्हा कार्यालयास व जिल्हा कार्यालयामार्फत शाळांना समाजसेवार्थ प्रणालीव्दारे अदा करण्यात येतात.
(३) हे खरे नाही.
(४) थकीत वेतन व वेतनेतर अनुदानाचे प्रस्ताव शासन परिपत्रक दिनांक १३/०९/२०२२ अनुसार संबंधितांकडून प्राप्त करुन घेण्यात येत असून प्रस्ताव प्राप्त होताच सातव्या वेतन आयोगाची थकबाकी देण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.
(५) जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद यांचेकडून शाळानिहाय प्रस्ताव प्राप्त होताच शासनास सादर झाल्यानंतर सातव्या वेतन आयोगाची थकबाकी देण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

---

## नवी मुंबई महानगरपालिकेच्या सीबीएससी बोर्डाच्या शाळेत प्रवेश प्रक्रियेस विलंब होत असल्याबाबत

**(५) १९८६६ (०८-०८-२०२३) श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई महानगरपालिकेच्या सीबीएससी बोर्डाच्या शाळेत प्रवेश घेण्यासाठी सुमारे ५०० विद्यार्थ्यांचे अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी १२० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार आहे, परंतु या प्रवेशप्रक्रियेला विलंब होत असल्याने पालकांनी नाराजी व्यक्त केली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिकेच्या शाळांमध्ये चालू शैक्षणिक वर्षात विद्यार्थी प्रवेश घेत असताना प्रवेश प्रक्रियेस झालेल्या विलंबामुळे अनेक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिकेच्या सीबीएससी बोर्डाच्या शाळांमध्ये प्रवेश प्रक्रियेस विलंब करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली, तसेच प्रवेशाकरीता विद्यार्थ्यांची संख्या वाढविणेबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२६-०८-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) नवी मुंबई महानगरपालिकेच्या सीबीएससी बोर्डाच्या शाळेत विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची प्रक्रिया विहित वेळेत राबविण्यात आलेली आहे. सदर विद्यार्थी शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवसापासून शाळेत शिक्षण घेत आहेत. सदर विद्यार्थ्यांच्या प्रवेशास विलंब झाला, ही बाब वस्तुस्थितीस धरून नाही.
त्यामुळे संबंधितांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्न रुग्णालयांत ‘हेल्थ मॅनेजमेंट इन्फोर्मेशन सिस्टीम’ सुरु करण्याबाबत

**(६) २०६८९ (०८-०८-२०२३) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात रुग्णालयामध्ये येणाऱ्या रुग्णांची माहिती एकत्रित राहावी, यासाठी वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अखत्यारीत येणाऱ्या वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्न रुग्णालयांत सुरु करण्यात आलेली ‘हेल्थ मॅनेजमेंट इन्फोर्मेशन सिस्टीम’ (एचएमआयएस) मागील एका वर्षापासून बंद असल्याची बाब दिनांक २३ जून, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू महाविद्यालयात ‘हेल्थ मॅनेजमेंट इन्फोर्मेशन सिस्टीम’ बंद असल्याने डॉक्टरांना जुन्या पध्दतीने रुग्णांची माहिती लिहून काढावी लागत असल्याने त्यांच्यावरील ताण वाढत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अखत्यारीत येणाऱ्या वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्न रुग्णालयांत ‘हेल्थ मॅनेजमेंट इन्फोर्मेशन सिस्टीम’ (एचएमआयएस) तातडीने पुनश्च सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२६-०७-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

(३) वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाच्या अखत्यारीत येणाऱ्या सर्व शासकीय वैद्यकीय/दंत/आयुर्वेदीक महाविद्यालये व संलग्नित रुग्णालयांमध्ये एन.आय.सी. ने विकसित केलेली नेक्स्टजेन ई-हॉस्पीटल ही 'हेल्थ मॅनेजमेंट इन्फोर्मेशन सिस्टीम' (एचएमआयएस) दिनांक ११/०७/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये ५१ संस्थांमध्ये अंशत: कार्यान्वित करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुसद व दिग्रज (जि.यवतमाळ) तालुक्यासह जिल्ह्यात डासांचा प्रादुर्भाव वाढल्याने साथीचे आजार पसरल्याबाबत

**(७) २११५३ (०५-०१-२०२४) श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुसद व दिग्रज तालुक्यासह (जि.यवतमाळ) जिल्ह्यात डासांचा प्रादुर्भाव वाढल्याने डेंग्यू, मलेरिया, टायफाईड, सर्दी, खोकला, थंडी तापासह साथीच्या आजाराचे प्रमाण वाढल्याने रुग्णांची संख्या वाढत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी सदरचे साथीचे आजार रोखण्यासाठी प्रयत्न अपूरे पडत असून रुग्णांच्या संख्येत प्रचंड प्रमाणात वाढ होत असल्याने रुग्णांना योग्य उपचार देऊन यवतमाळ जिल्ह्यातील या साथीच्या आजारांना आळा घालण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२३-०८-२०२४) :** (१) हे खरे आहे.

सन २०२२ व २०२३ च्या ऑक्टोबर अखेरच्या तुलनेमध्ये आजारांची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| तालुका/जिल्हा | हिवताप | | डेंग्यू | | टायफॉईड | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०२२ | २०२३ | २०२२ | २०२३ | २०२२ | २०२३ |
| पुसद | ० | ० | ०३ | ११ | ०३ | ०५ |
| दिग्रज | ० | ० | ०१ | ०२ | ०२ | ०२ |
| यवतमाळ | ०१ | ३ | ८८ | २७६ | १०९६ | २५७५ |

(२) विविध उपाययोजना आखुन राज्यातील साथरोग परिस्थिती नियंत्रणात ठेवण्याचा प्रयत्न नियमितपणे केला जातो.

- ➢ या आजारांच्या प्रतिबंधासाठी खालील उपाययोजना राबविल्या जातात.
  - यवतमाळ जिल्ह्यात डेंगू निदान निश्चितीकरीता श्री.व.ना. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ येथे रक्तजल नमुने तपासणीची सोय करण्यात आली आहे.
  - यवतमाळ जिल्ह्यात हिवतापाकरीता माहे जानेवारी ते ऑक्टोबर, २०२३ मध्ये ४६०२७२ इतके रक्त नमुने घेण्यात आले त्यामध्ये ३ रुग्ण दूषित आढळून आले सर्व दूषित रुग्णांना त्वरित समूळ उपचार देण्यात आले.

- तर माहे जानेवारी ते ऑक्टोबर या कालावधीत एकूण ७४९८ रक्तजल नमूने तपासण्यात आले, त्यामध्ये २७६ रुग्ण डेंग्यू दूषित आढळून आले. डेंग्यू व चिकनगुनियासाठी यवतमाळ जिल्ह्याने सर्वाधिक रक्तजल नमुने तपासणी केलेली आहे.
- तसेच हिवताप व इतर साथींच्या आजार आटोक्यात आणण्यासाठी तातडीने उपाययोजना राबविण्यात आलेल्या आहेत. जीवशास्त्रीय उपाययोजनेंतर्गत ऑक्टोबर, २०२३ अखेर २२१७ इतक्या डास्योत्पत्ती स्थानांमध्ये गप्पी मासे सोडले.

➢ तसेच, साथरोगाच्या प्रतिबंधासाठी खालील उपाययोजना राबविण्यात येतात-

- साथरोगाचे नियमित सर्वेक्षण,
- नियमित किटकशास्त्रीय सर्वेक्षण,
- साथरोग निदानासाठी व्यापक प्रयोगशाळांचे जाळे,
- साथ उद्रेक प्रतिबंधासाठी जिल्हास्तरावर शीघ्र प्रतिसाद पथके कार्यरत,
- साथरोग रुग्ण व्यवस्थापनासाठी सार्वजनिक रुग्णालयात सुविधा उपलब्ध,
- साथरोग प्रतिबंध व नियंत्रणासाठी सर्व जिल्हयांना व आरोग्य संस्थाना पुरेशी औषधे व साधनसामुग्री यांचा पुरवठा,
- किटकजन्य आजार नियंत्रणसाठी एकात्मिक किटक व्यवस्थापन, परिसर स्वच्छता, किटकनाशक फवारणी, धूर फवारणी, गप्पी मासे यांचा वापर, मच्छरदाणी वाटप इत्यादी,
- सरकारी, खाजगी डॉक्टरांचे आणि आरोग्य कर्मचाऱ्यांचे साथरोग प्रतिबंध संदर्भात नियमित प्रशिक्षण,
- विविध साथरोग प्रतिबंधासाठी लोक सहभाग आणि आरोग्य शिक्षण,
- राज्यस्तरावर साथरोग नियंत्रणासाठी महाराष्ट्र साथरोग प्रतिबंध व नियंत्रण तांत्रिक समिती कार्यरत,
- जलजन्य आजार नियंत्रसाठी नियमित पाणी गुणवत्ता सनियंत्रण,
- दरवर्षी पाणी गुणवत्ता तपासण्यासाठी वर्षातून दोन वेळा स्वच्छता सर्वेक्षण,
- गावपातळीवर पाणी शुध्दीकरणासाठी नियुक्त कर्मचाऱ्यांचे नियमित प्रशिक्षण,
- पाणी शुध्दीकरणासाठी वापरण्यात येणाऱ्या टीसील पावडरची नियमित गुणवत्ता तपासणी,

अशा विविध उपाययोजना आखून राज्यातील साथरोग परिस्थिती नियंत्रणात ठेऊन त्यामुळे होणारे मृत्यू टाळण्याच्या प्रयत्न नियमितपणे केला जातो. या उपाययोजना आखल्यामुळेच राज्य हिवताप आजार दुरीकरण टप्प्यावर पोहोचले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई शहरात खाजगी विकासकाने उपकर प्राप्त इमारतीच्या पुनर्विकासाचे काम अपूर्णावस्थेत ठेवल्याबाबत

**(८) २११८५ (०४-०१-२०२४) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात गत १० वर्षापासून खाजगी विकासकाने उपकर प्राप्त इमारतीच्या पुनर्विकासाचे काम अपूर्ण अवस्थेत ठेवल्यामुळे तेथील स्थानिक रहिवाशी बेघर झाले आहेत. सदरच्या १० पुनर्विकास प्रकल्पाचे काम म्हाडामार्फत करण्यात यावे असा प्रस्ताव म्हाडाकडे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान आला असून सदर प्रस्तावाला मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाने विकासकांना कारणे दाखवा नोटिसा माहे जुलै, २०२३ रोजी वा त्यासुमारास बजावल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्तावास अद्याप मान्यता देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्तावास तातडीने मान्यता देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (१२-०७-२०२४) :** (१) होय, अंशत: खरे आहे.
(२) व (३) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने १२ प्रकरणांमध्ये भुसंपादनाचा प्रस्ताव शासनास सादर असून त्यापैकी ०४ प्रकरणांमध्ये भुसंपादनास मान्यता दिली आहे. उर्वरित ०८ प्रकरणांमध्ये भुसंपादनास मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सातारा जिल्ह्यात अंगणवाड्या भाड्याच्या इमारतीत, समाज मंदिर, देवालय व ग्रामपंचायतीमध्ये भरविण्यात येत असल्याबाबत

**(९) २१२०२ (०५-०१-२०२४) श्री.अरुण लाड :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्ह्यात सुमारे १०३६ अंगणवाड्यांना स्वत:च्या इमारती नसल्यामुळे भाड्याच्या इमारतीत, समाज मंदिर, देवालय व ग्रामपंचायतीमध्ये भरविण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कुपोषण मुक्तीसाठी अंगणवाड्यांची भूमिका अत्यंत महत्वाची असल्यामुळे अंगणवाड्यांना स्वत:च्या इमारती बांधून देण्याबाबत तसेच लहान मुलांना शाळेची गोडी लागावी यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (०१-०७-२०२४) :** (१) एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत सातारा जिल्ह्यामधील अंगणवाड्यांची स्थिती खालीलप्रमाणे आहे. :-

| क्षेत्र | मंजूर अंगणवाडी केंद्र | स्व: इमारतीतील अं. केंद्र | भाड्याच्या इमारतीतील अंगणवाडी केंद्र | समाज मंदिरामध्ये कार्यान्वित अंगणवाडी केंद्र | देवालय | ग्रामपंचायत/ नगरपालिकेची इमारत | शाळा इमारतीत | इतर खाजगी जागेत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ग्रामीण | ४५६० | ३३५३ | ४७७ | ७७ | १८ | १४८ | ३९३ | ९४ |
| नागरी | ३६६ | ११९ | १५९ | ५८ | १ | १२ | १७ | ०० |

(२) व (३) शासन निर्णय दिनांक ३१/०१/२०२२ अन्वये महिला व बाल सशक्तीकरण योजनेसाठी "जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण)" अंतर्गत किमान ३ टक्के इतका निधी कायमस्वरूपी उपलब्ध करण्यात आला आहे. त्यामध्ये अंगणवाडी बांधकामाचे प्रावधान करण्यात आले आहे. सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या निधीमधून सातारा जिल्ह्यात ९२ अंगणवाडी केंद्र इमारत बांधकामे सुरू आहेत. तर सन २०२३-२४ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेमधून ११४ अंगणवाडी इमारत बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या आहेत. तसेच सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरीता २२२ अंगणवाडी बांधकामाचा जिल्हा वार्षिक आराखडा जिल्हा नियोजन समितीस सादर करण्यात आला आहे. नागरी क्षेत्रातील अंगणवाडी बांधकामाकरीता नगरपालिकेकडे जागा उपलब्ध करून देण्याबाबत कळविलेले आहे. याशिवाय केंद्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे राज्यातील ग्रामीण व नागरी भागातील अंगणवाडी केंद्रांच्या भाडेदरामध्ये शासन निर्णय दिनांक १७/०८/२०२३ अन्वये वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे चांगल्या इमारती अंगणवाडी केंद्रास भाडेतत्वावर उपलब्ध होतील.

---

## माळीवाडगांव (ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यातील ग्रा.मा.१७१ रस्त्याचे काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून करणेबाबत

**(१०) २१२४४ (०५-०१-२०२४) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंगापूर (जि.छत्रपती संभाजीनगर) तालुक्यातील राज्यमार्ग ७५२ H ते माळीवाडगांव ग्रा.मा.१७१ या ४.५ कि.मी.च्या रस्त्याचे २५ वर्षापुर्वी रोजगार हमी योजनेतून खडीकरण करण्यात आले असून, सदर रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे परिसरातील विद्यार्थी, शेतकरी व ग्रामस्थ यांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचा मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेत समावेश असून त्याची प्राधान्य क्रमांत नोंद नसल्यामुळे या रस्त्याचे काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागरीकांची गैरसोय टाळण्यासाठी सदर रस्ता प्राधान्याने क्रमांक घेऊन सदर रस्त्याचे काम संशोधन व विकास (आर.डी.) अतंर्गत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (२९-०८-२०२४) :** (१) व (२) ग्रामीण भागातील न जोडलेली गावे/ लोकवस्त्या बारमाही रस्त्यांद्वारे जोडण्यासाठी मुख्यमंत्री ग्राम सडक योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. प्रश्नाधीन रस्तातील माळीवाडगांव हे बारमाही रस्त्यांने जोडले गेले असल्याने त्याचा समावेश कोअरनेटवर्कमध्ये नाही. यास्तव त्याचा समावेश प्राधान्यक्रम यादित नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर येथील जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभागातील कनिष्ठ लिपिक यांच्या मनमानी आणि भ्रष्ट कारभाराबाबत

**(११) २१३०६ (०९-०१-२०२४) श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर येथील जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभागातील कनिष्ठ लिपिक यांच्या मनमानी आणि भ्रष्ट कारभाराबाबत शिक्षक संघटनांनी लेखी तक्रार केली असून कामानिमित्त आलेल्या मुख्याध्यापक, शिक्षक, लिपिक यांच्याशी उध्दटपणे बोलून त्यांचा अपमान करणे, कार्यालयीन काम स्वतः न करता शासकीय कामासाठी खाजगी लिपिक व शिपाई यांची नेमणूक त्यांनी केली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त कनिष्ठ लिपिक यांच्या भ्रष्ट व मनमानी कारभाराबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (०५-०७-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.

सोलापूर जिल्हा परिषदेमधील माध्यमिक शिक्षण विभागातील लिपिक श्री.बाणूर यांच्या बाबत शिक्षक संघटनेकडून तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. तथापि, त्यांनी शासकीय कामासाठी खाजगी लिपिक व शिपाई यांची नेमणूक केलेली नाही.
(२) तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित लिपिकाची दिनांक १७/०८/२०२३ रोजी बदली केली आहे. तसेच पुढील चौकशी जिल्हा परिषद स्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भंडारा जिल्ह्यातील रुग्णालयांमध्ये उच्च रक्तदाब व मधुमेह औषधाचा तुटवडा भासत असल्याबाबत

**(१२) २१७८४ (०५-०१-२०२४) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, प्रा.राम शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्ह्यातील रुग्णालयांमध्ये उच्च रक्तदाब व मधुमेह औषधाचा तुटवडा भासत असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून यापूर्वी सदर औषधाचा पुरवठा हा राज्यस्तरावरून करण्यात येत होता, परंतु माहे ऑक्टोबर, २०२२ पासून शासनस्तरावरून या औषधाचा पुरवठा बंद झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, औषध खरेदीसाठी वार्षिक मागणीच्या अनुषंगाने अनुदान प्राप्त होत नसल्याने या रुग्णालयाला निधीचा तुटवडा भासत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उच्च रक्तदाब व मधुमेह या आजारावरील औषधे रुग्णांना पुरवण्यासाठी शासनस्तरावर तात्काळ निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२३-०८-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) उच्च रक्तदाब व मधुमेह या आजारावरील औषध खरेदीसाठी भंडारा जिल्हा रुग्णालयाकरीता खालीलप्रमाणे अनुदान वितरित करण्यात आलेले आहे.

सन २०२२-२३

| अ.क्र. | स्तर/योजना | भंडारा जिल्हा (वितरित निधी) |
|---|---|---|
| १. | आरोग्य सेवा आयुक्तालय | रुपये ५०.०० लाख |
| २. | राष्ट्रीय आरोग्य अभियान | रुपये १४०.००लाख |
| ३. | असंसर्गजन्य आजार | रुपये १२.९९ लाख |
| ४. | जिल्हा नियोजन | रुपये २५०.००लाख |

सन २०२३-२४

| अ.क्र. | स्तर/योजना | भंडारा जिल्हा (वितरित निधी) |
|---|---|---|
| १. | आरोग्य सेवा आयुक्तालय | रुपये ७५.३३ लाख |
| २. | राष्ट्रीय आरोग्य अभियान | रुपये ४५.०० लाख |
| ३. | असंसर्गजन्य आजार | रुपये ३.०९ लाख |
| ४. | जिल्हा नियोजन | रुपये ३००.०० लाख |

तसेच राज्यस्तरावरील योजनेतंर्गत उच्च रक्तदाब व मधुमेहांवरील औषधांची खरेदी महाराष्ट्र वैदयकीय वस्तु खरेदी प्राधिकरणामार्फत करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नवी मुंबई (महापे) येथील श्री आनंदनगर सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी राखीव असलेला भूखंड वितरित केल्याबाबत

**(१३) २१८०२ (०५-०१-२०२४) श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महापे, नवी मुंबई येथील ओएस ११ ए हा श्री आनंदनगर सहकारी गृहनिर्माण संस्था व संस्थेची कुळे यांचेसाठी राखीव असलेल्या भूखंडावर महामंडळाने कुळास व स्थानिकास डावलून सदर भूखंड वितरित केला असल्याने त्याबाबतचा योग्य तो निवाडा घोषित करून स्थानिक कुळ कब्जेदारास नुकसान भरपाई व भूखंड देईपर्यंत स्थगिती देणे बाबतची मागणी स्थानिक जनतेने मा.उद्योग मंत्री महोदय यांच्याकडे माहे जुलै, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्थानिक कुळ कब्जेदारास नुकसान भरपाई व भूखंड देईपर्यंत स्थगिती देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२०-०८-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही.
अशा प्रकारचे कोणतेही निवेदन शासनास प्राप्त झालेले नाही. तसेच आनंदनगर सहकारी गृहनिर्माण संस्था व संस्थेची कुळे यांचेसाठी मऔवि महामंडळामार्फत भुखंड राखीव ठेवण्याबाबत निर्णय झालेला नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंगोली जिल्ह्यातील रूग्णालयांमधील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१४) २१८०५ (०५-०१-२०२४) डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हातील वसमत उपजिल्हा रूग्णालयामध्ये रिक्त पदांमुळे महत्वाच्या शस्त्रक्रिया पुढे ढकलण्यात आल्याचे तसेच शासकीय रुग्णालयासोबतच बसमत, कळमनुरी येथे उपजिल्हा रुग्णालय तर सेनगाव, औंढा नागनाथ, आखाडा बाळापूर येथे ग्रामीण रुग्णालय तसेच बसमत येथील महिला रुग्णालय येथील रिक्त पदांमुळे नागरिकाना आरोग्य सेवा मिळत नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपजिल्हा रुग्णालयामध्ये औषध निर्माण अधिकारी मंजूर पदे ३, रिक्त पदे ३, नेत्रचिकित्सा मंजूर पदे १, रिक्त पदे १, बाह्यरूग्ण लिपिक मंजूर पदे १, रिक्त पदे १, शस्त्रक्रिया सहाय्यक मंजूर पदे १, रिक्त पदे १, दंत सहाय्यक मंजूर पदे १, रिक्त पदे १, कक्ष सेवक मंजूर पदे ५, रिक्त पदे ३, शिपाई मंजूर पदे २, रिक्त पदे २, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी मंजूर पदे १, रिक्त पदे १, सहाय्यक अधिसेविका मंजूर पदे १, रिक्त पदे १, अधिपरिचारीका मंजूर पदे १२, रिक्त पदे २, वैद्यकिय अधिकारी मंजूर पदे १२, रिक्त पदे २. असून हिंगोली जिल्ह्यातील औंढानागनाथ येथील ग्रामिण रूग्णालयामध्ये सुध्दा मोठ्या प्रमाणात वर्ग ३ व ४ ची २५ पदे मंजूर असून सुध्दा त्यापैकी १२ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपजिल्हा रूग्णालयामध्ये डायलिसिस सुविधा मंजूर झाली असून आतापर्यंत डायलिसिस सेवा सुरू झाली नसून कळमनुरी येथील उपजिल्हा रूग्णालयात फिजीशियन व आय.सि.यु.चा सेटअप नसल्यामुळे बाह्यरूग्णांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असून हिंगोली जिल्ह्यातील सेनगांव मध्ये सेनगांव ग्रामिण रूग्णालयाला उपजिल्हा रूग्णालयाचा दर्जा देण्याचा जिल्हा रूग्णालयाकडुन प्राप्त झालेला प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने हिंगोली जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयातील रिक्त पदांचा आढावा घेऊन सदरील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (०४-०८-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) सार्वजनिक आरोग्य विभागातील गट क व ड संवर्गाच्या पदभरतीसाठी दिनांक २८/०८/२०२३ रोजी जाहिरात देण्यात आलेली आहे. सदर पदभरती परीक्षा दिनांक ३०/११/२०२३ ते दिनांक १२/१२/२०२३ या कालावधीत घेण्यात आलेली आहे. गुणवत्ता धारक उमदेवारांना नियुक्ती पत्र देण्याची कारवाई आयुक्त, आरोग्य सेवा आयुक्तालय यांच्या स्तवरावर करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंगोली तालुक्यातील (जि.हिंगोली) कोथळज ते समगा रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(१५) २१९४५ (०५-०१-२०२४) डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली तालुक्यातील (जि.हिंगोली) कोथळज ते समगा रस्त्याची प्रंचड प्रमाणात दुरवस्था झाल्याने या भागातील विद्यार्थी, ग्रामस्थांची प्रंचड गैरसोय होत असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत वारंवार मागणी करुनही दखल घेतली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (०५-०८-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रजिमा ०४ ते कोथळज समगा (सा.क्र. ०/००० ते ६/४०० किमी) ता.हिंगोली, जि.हिंगोली या रस्त्याच्या कामास प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत (सन २०२०-२१) मंजूरी देण्यात आली आहे. सदर रस्त्याच्या एकूण ६.४ कि.मी.लांबीपैकी ५.८ कि.मी.लांबीचे मजबुतीकरण व डांबरीकरण पूर्ण झाले असून ४ पुल व मोऱ्यांचे काम पूर्ण झाले आहे. सदर रस्त्यावर सा.क्र. ५.६०० ते ६.१०० या भागात पांदन आहे. तसेच सा.क्र. ६.१०० ते ६.२०० या भागात रेल्वेची हद्द आहे.

सदर रस्त्यावर सा.क्र/०५/६०० ते ६.१०० या भागात जमीनवाद निर्माण झाल्यामुळे अद्याप काम करता आलेले नाही. सद्य:स्थितीत, संबंधित ग्रामस्थ, शेतकरी व महसूल विभागाचे अधिकारी यांच्याशी चर्चा करून जमीनवाद मिटवण्याचा प्रयत्न सुरू आहे. सदरचे काम विहित मुदतीत पूर्ण करून घेण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईच्या जे.जे. महानगर रक्तपेढीत उपकरणाची कमतरता असल्याने रक्त संकलन व साठवणूकीकरीता अडचणी येत असल्याबाबत

**(१६) २२३४२ (०५-०१-२०२४) श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या ग्रँट वैद्यकीय महाविद्यालय परिसरातील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारितील जे.जे.महानगर रक्तपेढीची दुरावस्था झाल्याचे तसेच रक्त संकलन, साठवणूक आणि विलगीकरणासाठी आवश्यक असणारी उपकरणे जुनी झाली असल्याचे दिनांक २९ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यासाठी नॅट टेस्टिंग, ब्लड बॅग सेलर, हिमोग्लोबीन चाचणीसाठी शिबिरांच्या ठिकाणी होमोक्यु यंत्र, ब्लड बॅग वेट यंत्र आदि अनेक गोष्टींची आवश्यकता असताना आरोग्य संचालक व रक्तपेढीशी संबंधित सहाय्यक संचालकांनी मागील अनेक वर्षात एकदाही जे.जे.महानगर रक्तपेढीला भेट देऊन पाहणी देखील केली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जे.जे.महानगर रक्तपेढी प्रशासनाने अधिकाऱ्यांची रिक्त पदे व वेतन विसंगती इत्यादीसह मा.सार्व.आरोग्य मंत्री तसेच अतिरिक्त मुख्य सचिव (आरोग्य) मंत्रालय यांना निवेदने देण्यात आली असून त्याद्वारे कार्यवाहीची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने अधिकाऱ्यांची रिक्त पदे व वेतन विसंगती दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (२३-०८-२०२४) :** (१) हे खरे नाही.

सदरच्या रक्तकेंद्रास अद्ययावत व अत्याधुनिक अशी यंत्रसामुग्री पुरविण्यात आलेली आहे.
(२) हे खरे नाही.

औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्याअंतर्गत नियम १९४५ नुसार नॅट टेस्ट (न्युक्लिईक ॲसिड टेस्ट) बंधनकारक नाही. याबाबत सहाय्यक संचालक जनरल, नॅको, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी देखील सदर नॅट टेस्ट बंधनकारक नसल्याचे कळविले आहे. ही एक अतिरिक्त सुरक्षा चाचणी आहे.

इतर साहित्यसामुग्री उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. संचालक व सहाय्यक संचालक हे वेळोवेळी रक्तकेंद्रास भेट देऊन कामकाजाचा आढावा घेत असतात.
(३) होय. हे खरे आहे.
(४) रक्त संक्रमण अधिकाऱ्याच्या एका पदाशिवाय सर्व रिक्त पदे भरलेली आहेत. रक्त संक्रमण अधिकाऱ्याची जागा अनुसुचित जमातीसाठी आरक्षित आहे व त्यासाठी दोन वेळेस जाहिरात देऊन देखील उमेदवार उपलब्ध होऊ शकला नाही. कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मागणीप्रमाणे वेतनवाढीचा दर दिनांक ०१/०४/२०२३ पासून ५% वरुन ८% करण्यात आलेला आहे व इतर मागण्यांसाठी संचालक, आरोग्य सेवा यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भुसावळ (जि.जळगांव) शहरातील क्रीडा संकुलाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(१७) २२५५७ (०५-०१-२०२४) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव जिल्ह्यातील भुसावळ शहरातील तालुका क्रीडा संकुलाच्या कामासाठी सुमारे ७ कोटी ३० लाख रुपयांचा निधी मंजूर असूनही क्रीडा संकुलाचे काम अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू क्रीडा संकुलाचे काम पूर्ण करणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय बनसोडे (२९-०७-२०२४) :** (१) व (२) भुसावळ तालुका क्रीडा संकुलातील सुविधांची कामे प्रगतीपथावर असून संकुलासाठीच्या रुपये ८९५.९७ लक्ष कामांच्या अंदाजपत्रकाला मान्यता देऊन त्याप्रमाणे रुपये ८६१.८७ लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे. सदर निधीतून या क्रीडा संकुलमध्ये २०० मी धावनपथ, जलतरण तलाव, विविध खेळांची मैदाने-कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल कोर्ट, टेनिस कोर्ट, संरक्षण भिंत इ. सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी ई-निविदा प्रक्रिया राबवुन मे.इंदरदिप कन्स्ट्रक्शन को. इंजिनिअरर्स ॲड कॉन्ट्रॅक्टर, ठाणे यांना दिनांक २४/०७/२०२३ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत. त्यानुषंगाने पुढील कार्यवाही सुरु असून सदर संकुलाचे ३५% बांधकाम पूर्ण झाले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील मान्यताप्राप्त विनाअनुदानित शाळांमधील पहिली ते आठवीपर्यंत शिक्षण घेत असलेल्या मुलांना पोषण आहार देण्याबाबत

**(१८) २३४१६ (२२-०७-२०२४) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शासकीय तसेच शासन अनुदानित शाळांमधील पहिली ते आठवीपर्यंत शिक्षण घेत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना पोषण आहारामध्ये उन्हाळी सुट्टी लागेपर्यंत अंडी आणि केळीचा लाभ देण्याचे स्पष्ट निर्देश प्राथमिक संचालनालयाने दिले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासमुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील मान्यताप्राप्त विनाअनुदानित शाळांमध्ये पहिली ते आठवीपर्यंत शिक्षण घेत असलेल्या मुलांचीही संख्या मोठ्या प्रमाणात असल्यामुळे केवळ शासकीय आणि अनुदानित शाळांमधील विद्यार्थ्यांना पोषण आहार देण्यात येत असल्याने प्राथमिक शिक्षण संचालनालय या विद्यार्थ्यांमध्ये दुजाभाव करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सर्व शाळांमध्ये शिकणारे विद्यार्थी सारखेच मानून त्यांना पोषण आहार दिला जात नसल्याने त्यांचे कुपोषण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषांगाने मान्यताप्राप्त विनाअनुदानित शाळांमधील पहिली ते आठवीपर्यंत शिक्षण घेत असलेल्या मुलांना पोषण आहार देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (०७-०८-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत नाविण्यपूर्ण उपक्रमामधून विद्यार्थ्यांना आठवड्यातून एक दिवस अंडी व केळीचा लाभ देण्याबाबत शिक्षण संचालक (प्राथ.) यांनी दिनांक ०१ एप्रिल, २०२४ रोजी परिपत्रक निर्गमित केले आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेचा लाभ राज्य व केंद्र शासनाच्या, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, खाजगी अनुदानित व अंशत: अनुदानित शाळांमधील इ.१ ली ते इ.८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना देण्यात येतो.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्याबाबतची मागणी प्रलंबित असल्याबाबत

**(१९) २३४२१ (२२-०७-२०२४) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा यासाठी ज्येष्ठ साहित्यिक रंगनाथ पाठारे यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्ती केलेल्या समितीने मराठी भाषा अभिजात असल्याचा अहवाल केंद्र सरकारला सन २०१३ मध्ये सादर केला असून त्यास बारा वर्षापेक्षाही जास्त कालावधी होऊन तो तसाच प्रलंबित असल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्रीय सांस्कृतिक मंत्र्याच्यावतीने राज्यसभेत मराठीच्या अभिजात दर्जा विषयी कोणताही अहवाल केंद्र शासनाकडे प्रलंबित नसल्यामुळे सर्व मराठी भाषिकात नाराजी व्यक्त करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मराठी भाषेला तात्काळ अभिजात दर्जा देण्यासाठी राज्य शासनाने केंद्राकडे पाठपुरावा करण्यासाठीचा आराखडा शासनाकडे उपलब्ध आहे काय, असल्यास, त्याचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

**श्री.दिपक केसरकर (०६-०८-२०२४) :** (१), (२) व (३) एखाद्या भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याची कार्यवाही केंद्र शासनाकडून केली जाते. यासाठी केंद्र शासनाने काही निकष विहीत केले आहेत. या निकषाच्या आधारे संशोधन आणि अभ्यास करुन मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासंदर्भात अहवाल सादर करण्यासाठी राज्य शासनाने ज्येष्ठ साहित्यिक प्रा. रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली मराठी भाषा तज्ज्ञ संशोधकांची समिती गठीत केली होती. या समितीने जुने संदर्भ, प्राचीन ग्रंथ, पुरातन काळातील ताम्रपट, कोरीव लेख, शिलालेखांचा संदर्भ इ. प्राचीन दस्ताऐवज तपासले असून त्यांचा आधार घेऊन पुराव्यासह एक सर्वंकष व परिपूर्ण अहवाल शासनास सादर केला आहे. या अहवालामध्ये सविस्तर विवेचनासह मराठी भाषा ही अभिजात भाषेचा दर्जा मिळणेसाठी विहीत केलेल्या निकषांची पूर्तता करते हे पुराव्यांसह स्पष्ट केले आहे.

समितीने तयार केलेला मराठी व इंग्रजी भाषेमधील अहवाल केंद्र शासनाकडे सन २०१३ मध्ये पाठविला आहे.

तद्नंतर मा.मुख्यमंत्री, मा.मुख्य सचिव, सचिव, मराठी भाषा तसेच माझ्या स्तरावरुन सातत्याने केंद्र शासनाकडे याप्रकरणी पाठपुरावा करण्यात आला आहे.

सन २०२० च्या द्वितीय अर्थसंकल्पीय अधिवेशनात "मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबत केंद्र शासनाने तातडीने निर्णय घ्यावा अशी शिफारस करणारा" शासकीय ठराव महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये पारित करुन पुढील कार्यवाहीसाठी केंद्र शासनास अग्रेषित करण्यात आला आहे.

शासन निर्णय, मराठी भाषा विभाग, दिनांक १४/०२/२०२४ अन्वये मराठी भाषेस अभिजात भाषेचा दर्जा मिळण्याच्या अनुषंगाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्याकरीता एक समिती गठित करण्यात आली आहे. सदर समितीच्या दोन बैठका पार पडल्या असून सदर समितीव्दारे केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

---

## मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत कोडोली ते पांढरवाडी रस्त्याचे काम रद्द करणेबाबत

**(२०) २३७५३ (२०-०७-२०२४) श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत सन २०१९-२० मध्ये राज्यमार्ग-१४१ कोडोली ते पांढरवाडी रस्ता सुधारणा (ग्रामा/१९३ एलआर-२९) या रस्त्याचे कामास शासनाने मंजुरी दिली असून रस्त्यांच्या कंत्राटदाराने काम सुरु केल्यानंतर काही शेतकऱ्यांनी व ग्रामास्थांनी सदरचे काम करण्यास प्रतिबंध केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोडोली ग्रामपंचायतीची निवडणूक झाल्यावर नव्याने प्रस्थापित झालेल्या ग्रामपंचायत मंडळाने सदर रस्त्याचे काम रद्द करण्याबाबत ग्रामपंचायत ठराव करुन सदरचा रस्ता कोडोली कृष्णधाम मंदिर मागे पांढरवाडी करण्यात यावा अशी मागणी शासनाकडे केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याप्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (०१-०८-२०२४) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

रामा-१४० कोडोली ते पांढरवाडी रस्ता एलआर २९ ग्रामा १९३ सा. क्र. ०/०० ते २/५३० या कामास मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा २ आशियाई बँक विकास (ADB) निधी अंतर्गत रुपये १३९.८१ लक्ष इतक्या रकमेची प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. प्रस्तुत रस्त्यास कार्यारंभ आदेश दिल्यानंतर स्थानिक नागरिकांनी विरोध करून काम बंद केले. संबंधित कार्यकारी अभियंता यांनी समिती स्थापन करून समस्येचे निवारण करण्याचा प्रयत्न केला मात्र त्यास अपयश आले. स्थानिक नागरिकांनी मंजूर रस्त्या ऐवजी कोडोली कृष्णधाम मंदीरमार्ग पांढरवाडी एलआर २५ या ३.१०० कि.मी. लांबीच्या रस्त्याची मागणी केली. मात्र सदरहू रस्ता मंजूर रस्त्यापेक्षा ६०० मी अतिरीक्त असून त्यातील १.०० कि.मी. लांबी पूर्णपणे काळी माती व बागायत क्षेत्रातील आहे. यास्तव मागणी केलेला रस्ता करता येऊ शकणार नाही. सदरहू वस्तुस्थिती स्थानिक नागरिकांच्या निदर्शनात आणून दिल्यानंतरही विरोध कायम असल्याने मंजूर रस्त्याचे काम होऊ शकले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मुद्रणालय, नागपूर.